# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०४/२०२४ (रविवार) दुपार**

---

## मोटर सायकल चोरी करणारा आरोपीवर कारवाई

दिनांक ०६.०४.२०२४ रोजी यातील फिर्यादी नामे— श्री विकेश अंबालाल पटेल वय ४२ वर्ष रा सदावर्ती मंदीराजवळ जोगीठाणा पेठ उमरेड यांनी पोलीस स्टेशन उमरेड येथे येवुन रिपोर्ट दिला कि, दिनांक १४.०३.२४ ते १५.०३.२४ चे ०९.०० वा सुमारास त्यांची मोटर सायकल क्र एम एच ४० बी ४६९४ ही अंगणात एका बाजुला जुना भंगार सामानात ठेवली होती. दुसरे दिवशी सदर मोटर सायकल ठेवलेल्या ठिकाणी दिसुन न आल्याने आजुबाजुला विचारपुस केली. दिसुन आली नाही. गाडी फार जुनी असल्याने फिर्यादीने पोलीस स्टेशन उमरेड येथे तक्रार नोंदविली नाही. नंतर दुसरे दिवशी दिनांक ६.०४.२४ रोजी पोलीस स्टेशन उमरेड येथुन गुन्हयासंबंधाने विचारपुस करीता बोलावले असता फिर्यादीला कळले कि यातील **आरोपी नामे— मंगेश विकेश्वर गायकवाड, वय ३२ वर्ष रा धुरखेडा ता उमरेड** यांने फिर्यादीची मोटर सायकल सिडी डिलक्स एम एच ४० बी ४६९४ किंमती ५०००/— रू फियादीचे संमतीशिवाय चोरून नेली आहे. सदर आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम ३७९ भादविचा गुन्हा दाखल असुन तपासात आहे. पुढील तपास पोलीस हवालदार नरेंद्र पटले करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर